# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


१९) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०५.०५.२०२६

जिल्हा : अहिल्यानगर

| मागील आठवड्यातील हवामान (२८/०४/२०२६ ते ०४/०५/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०६/०५/२०२६ ते १०/०५/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | २९ | ३० | ०१ | ०२ | ०३ | ०४ | < दिनांक > | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ८ | ५ | ० |
| ४१.२ | ४०.४ | ४०.० | ३९.२ | ३७.८ | ३८.२ | ३८.८ | कमाल तापमान (अंसे) | ३९ | ४० | ३९ | ४० | ४० |
| १९.३ | १९.१ | १९.५ | १८.७ | १८.१ | १८.३ | १८.७ | किमान तापमान (अंसे) | २१ | २२ | २३ | २२ | २१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ढग स्थिती (आकाश) | ० | १ | ३ | ३ | २ |
| ६४ | ६० | ६१ | ६३ | ६४ | ६० | ६३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६२ | ५४ | ४६ | ४७ | ४० |
| २३ | २५ | २७ | ३१ | २८ | ३० | २९ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ११ | १३ | १३ | १४ | १२ |
| १.६ | १.८ | २.१ | २.३ | २.३ | २.१ | २.१ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १२ | १५ | १३ | ९ | १२ |

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार **पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. तसेच दि. ८ व ९ मे रोजी काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | **१) आच्छादनाचा वापर:** वाढत्या तापमानामुळे जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी गवत, पिकांचे अवशेष, पेंढा किंवा पॉलिथीनचा वापर 'मल्चिंग' (आच्छादन) म्हणून करावा.<br>**२) हलके सिंचन:** पिकांना पाण्याचा ताण पडू नये म्हणून आवश्यकतेनुसार हलके पाणी द्यावे.<br>ठिबक सिंचन: शक्य असल्यास ठिबक सिंचनाचा वापर करावा, ज्यामुळे मुळापाशी ओलावा टिकून राहतो.<br>**३) सिंचनाचा वेग:** पिकांच्या वाढीच्या संवेदनशील अवस्थांमध्ये पाणी देण्याचे प्रमाण वाढवावे.<br>संवेदनशील अवस्था: पिके फुलवऱ्यात असताना किंवा फळधारणेच्या स्थितीत असताना पाण्याचा ताण अजिबात पडू देऊ नका.<br>**४) आंतरमशागत टाळावी:** अति उष्णतेच्या काळात जमिनीत जास्त खोलवर मशागत किंवा कोळपणी करणे टाळावे, कारण यामुळे जमिनीतील ओल लवकर निघून जाते. |
| संदेश | | **दि. ८ व ९ मे रोजी काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| भाजीपाला | | पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या भाजीपाला पिकांची तोडणी लवकरात लवकर करावी आणि काढणी केलेला भाजीपाला सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. |
| फळ पिके | | पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या फळाची तोडणी/ काढणी लवकरात लवकर करावी आणि तोडणी/ काढणी केलेली फळे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. |
| शेती पीके | | पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. |
| कांदा | साठवणूक | वाढते तापमान लक्ष्यात घेता कांदाचाळीतील तापमान अधिक व आर्द्रता कमी असल्यामुळे वजनात घट होते. साठवणगृहातील तापमान व आर्द्रता यांचा विचार करणे आवश्यक असते. म्हणून नैसर्गिक वायुवीजनाचा वापर करून साठवणगृहाची रचना केल्यास तापमान व आर्द्रता काही अंशी मर्यादित ठेवून साठवणुकीतील नुकसान कमी करता येऊ शकते. |
| उन्हाळी भुईमूग | शेंगा पोसण्याची अवस्था | भुईमुग पिकास शेंगा पोसण्याच्या अवस्थेत (६५ ते ७० दिवस) पाण्याचा ताण पडू देऊ नये. या अवस्थेत संरक्षित पाण्याची पाळी गरजेप्रमाणे द्यावी. |
| ऊस | वाढीची अवस्था | ऊस पिकास दररोज ९.३३ लिटर पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज २ तास २० मिनिटे चालवावा.<br>सुरू ऊस लागवडीनंतर १६ ते १८ आठवड्यांनी रासायनिक खतांची मात्र देऊन पहारीच्या औजाराने वरंबे फोडून आंतर मशागत करावी व सायन कुळव रिजरने मोठी बांधणी करावी.<br>मोठ्या बांधणीच्या वेळी रासायनिक खतांची मात्रा नत्र १३६ किलो (युरिया २९५ किलो), स्फुरद ८५ किलो (सिंगल सुपर फॉस्फेट ५३१ किलो) व पालाश ८५ किलो (म्युरेट ऑफ पोटॅश १४२ किलो) प्रती हेक्टरी याप्रमाणात द्यावी. |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **फळ पिके** | | वाढत्या तापमानाच्या अनुषगाने उभ्या फळ पिकांना पाण्याचा ताण बसणार नाही याची दक्षता घ्यावी त्याकरीता पिकांना आवश्यकतेनुसार हलके सिंचन द्यावे. नविन लागवड केलेल्या फळाबागांच्या कलमी रोपांचे उन्हापासून संरक्षण करावे. गंभीर वाढीच्या टप्प्यावर सिंचनाची वारंवारता वाढवावी. फळझाडांच्या खोडांना बोर्डो पेस्ट किंवा चुन्याचा वापर करून पांढरा रंग द्यावा. यामुळे सूर्याची किरणे परावर्तित होतात आणि खोड फुटण्यापासून वाचते. |
| **भाजीपाला पिके** | | वाढत्या तापमानाच्या अनुषगाने नुकत्याच लागवड झालेल्या रोपाना सावली करण्याची व्यवस्था करावी. गरम वाऱ्याला अडथळा निर्माण होण्याकरीता शेताच्या कडेला, बांदावर व्यवस्था करावी. तात्पुरत्या स्वरूपात शेताच्या कडेला हिरवी जाळी (Green Net) लावता येते. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | | वाढत्या तापमानाच्या अनुषगाने शक्य असल्यास वेलाना व फळांना सावली करण्याची व्यवस्था करावी. गरम वाऱ्याला अडथळा निर्माण होण्याकरीता शेताच्या कडेला, बांदावर व्यवस्था करावी. तात्पुरत्या स्वरूपात शेताच्या कडेला हिरवी जाळी (Green Net) लावता येते. |
| **पशुसंवर्धन** | | वाढत्या तापमानाच्या अनुषगाने प्राण्यांना सावलीत ठेवावे आणि त्यांना पिण्यासाठी पुरेसे स्वच्छ व थंड पाणी उपलब्ध करून द्यावे. सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत प्राण्यांकडून कष्टाची कामे करून घेऊ नयेत. प्राण्यांना हिरवे गवत, प्रथिनेयुक्त, खनिज मिश्रण आणि मीठयुक्त खाद्य द्यावे. तसेच त्यांना सकाळी किंवा संध्याकाळी थंड वातावरणात चरण्यासाठी न्यावे. गोठ्याच्या छतावर पेंढा टाकावा, तसेच तापमान कमी ठेवण्यासाठी भिंतींना पांढरा रंग द्यावा किंवा शेण-मातीने सारवून घ्यावे. |
| **कुक्कुटपालन** | | वाढत्या तापमानाच्या अनुषगाने कोंबड्यांच्या शेडमध्ये पडदे आणि पुरेशी खेळती हवा (व्हेंटिलेशन) असावी. तापमान कमी करण्यासाठी भिंतींना पांढरा रंग द्यावा किंवा शेण-मातीने सारवून घ्यावे. |

**स्त्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.

दि. : ०५.०५.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**